दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४१ वा गुरूवार दि.१४ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# या ५० खोकेवाल्यांना घरी बसवा दलबदलूना धडा शिकवा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंचे आवाहन

लातूर / प्रतिनिधी :– महाराष्ट्रात रोज ७ शेतकरी आत्महत्या करत आहेत. मागील सहा महिन्यात तब्बल २३३६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. हे आकडे महायुती सरकारनेच विधिमंडळात सांगितले आहे. याबाबत हे महायुती सरकार काहीच बोलत नाही. कारण हे खोटे बोलणाऱ्यांचे सरकार आहे. त्यामुळे आता या ५० खोके घेणाऱ्यांच्या सरकारला आता घरी बसवण्याची वेळ आली आहे. तर विचाराला तिलाजली देणाऱ्या दलबदलूना धडा शिकवा, यासाठी मतदारांनी ही संधी गमवू नये, नाही तर हे सर्वसामान्य जनतेला संपवतील असे आवाहन करत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला. काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवारांच्या प्रचारार्थ काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची बुधवारी लातूर येथे जाहीर सभा पार पडली. त्या सभेत बोलताना खरगे यांनी केंद्र आणि राज्यातील सरकारवर जोरदार निशाणा साधला. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, तेलंगणाचे सिंचन मंत्री तेलंगणाचे सिंचन मंत्री उत्तमकुमार रेड्डी, कुणाल चौधरी, राजेश राठोड, खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस–महाविकास आघाडीचे उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे काँग्रेस–महाविकास आघाडीचे उमेदवार धिरज विलासराव देशमुख, उदगीरचे उमेदवार सुधाकर भालेराव, औशाचे उमदेवार दिनकर माने, निलंग्याचे उमेदवार अभय साळुंखे, माजी खासदार सुधाकर शृंगारे, वैजनाथ शिंदे, श्रीशैल उटगे, संतोष सोमवंशी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष संजय शेटे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी शेतकरी कामगार पक्षाचे नेते उदय गवारे लातूर लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे माजी महापौर दीपक सूळ आदिसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, आम आदमी पार्टी, शेतकरी कामगार पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक महिला पुरुष मोठ्या





संख्येने उपस्थित होते. खरगे पुढे म्हणाले, विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे सर्वाधिक लोकप्रिय नेते होते. सतत हसतमुख राहणाऱ्या विलासरावांनी आपल्या कामाच्या माध्यमातून मराठवाड्यासह राज्याचा चौफेर विकास केला. ज्यावेळी विलासराव बांधकाम विभागाचे खाते सांभाळत होते. त्यावेळचे विधानपरिषदेचे सभापती गवई यांनी विलासराव देशमुख हे एक यशस्वी मुख्यमंत्री होतील असे भाकीत केले होते. तेव्हा मी विचारात पडलो होतो, की एवढे दिग्गज नेते असताना देशमुख कसे काय मुख्यमंत्री होऊ शकतील. मात्र पुढे विलासरावांनी आपल्या कामाची छाप पाडून यशस्वीपणे एक लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राचे नेतृत्व केले, अशी आठवण यावेळी मल्लिकार्जून खरगे यांनी लातूरकरांना सांगितली. अमित देशमुखांनी विलासरावांचे नाव जपले – देशमुख कुटुंबियांचे कौतुक करताना खरगे म्हणाले की, आज मी ज्यावेळी अमित देशमुख यांना पाहतो. त्यावेळी मला विलासराव देशमुख यांची आठवण येते. त्यांच्या वागण्या बोलण्यात विलासरावांची छाप दिसून येते. अमित देशमुख यांनी विलासरावांचे नाव जपले आहे. तसेच धिरज देशमुख यांना पाहिल्यावर देखील आईसाहेबांची आठवण येते. त्याच प्रमाणे विलासराव देशमुख यांचे बंधू दिलीपराव देशमुख यांचे देखील अमित आणि धिरज देशमुख यांच्यावर आशीर्वाद आहेत. विलासरावांच्या माघारी त्यांनी एक कुटुंबप्रमुख म्हणून अतिशय चांगली जबाबदारी पार पडत चांगले संस्कार केले. कुटुंब एकत्र ठेवून देशमुख परिवार जनतेच्या सेवेत सक्रीय राहिला. यासाठी खरगे यांनी दिलीप देशमुख यांचेही कौतुक करत आभार मानले. अमित देशमुख यांनी मतदारसंघात केलेल्या २४०० कोटींच्या विकास कामाचे ही खरगे यांनी कौतुक केले. ते मतदारसंघासाठी काम करतात त्याप्रमाणे ते पक्षासाठी देखील कष्ट घेत आहेत. त्यांनी लातूर जिल्ह्यातील सहा जागांवर विजय मिळवण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच ते महाराष्ट्रातील इतर ठिकाणीही प्रचार करत असून त्या जागांवरही विजय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. मोदी खोटे बोलणाऱ्यांचे सरदार – पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रत्येकाला १५ लाख देतो, असे आश्वासन दिले होते. तसेच यांचे सरकार २ कोटी रोजगार देणार होते, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार होते. महिलांना मोफत गॅस देण्याचेही आश्वासन त्यांनी दिले होते. मात्र आज सत्तेत येऊन दहा वर्ष झाले तरी त्यांनी त्यांचे आश्वासन का पाळले नाही? असा सवाल करत नरेंद्र मोदी हे खोटे बोलणाऱ्यांचे सरदार असल्याची टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केली आहे. मोदींनी सोयाबीनला दर का दिला नाही? – विलासराव देशमुख यांनी मराठवाड्याचा विकास केला. पाणी प्रश्न सोडवण्यासाठी विशेष प्राधान्य दिले. त्यामुळेच लातूर आणि मराठवाडा हे संपन्न झाले आहे. परंतु आज केंद्रातील सरकारमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन दराचा प्रश्न गंभीर झाला आहे. येथील शेतकऱ्यांना सोयाबीन आणि कापसाला योग्य दर मिळत नाही. मोदी सरकारने सर्व काही वाढवले, महागाई वाढवली, प्रत्येक गोष्टीवर टॅक्स वाढवले, मग सोयाबीन कापसाचा दर का वाढवला नाही ? असा सवाल खरगे यांनी मोदी सरकारला केला. फडणवीस यांनी विरोधीपक्षात असताना सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देण्याची मागणी केली होती. मग आता सत्तेत असताना किती भाव देत आहेत. किमान ४८०० रुपये जो हमी भाव तो देखील दर शेतकऱ्यांना मिळत नसल्याची टीका खरगे यांनी यावेळी फडणवीस यांच्यावर केली. दिलेला शब्द आम्ही पूर्ण केला – अमित देशमुख यावेळी लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी काँग्रेस अध्यक्ष खरगे आणि लातूरच्या ऋणानुबंधाच्या आठवणीस उजाळा दिला. तसेच मागील पाच वर्षांत २४०० कोटींची विकासकामे केल्याचा उल्लेख त्यांनी करत दिलेला शब्द आम्ही पूर्ण केला असल्याचे सांगितले. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची लढाई लढण्यासाठी आपण एकत्र आलो असल्याचे सांगत अमित देशमुख यांनी महिलांच्या खात्यावर ३००० रुपये तर सुशिक्षित बेरोजगारांना ४००० रुपये आर्थिक सहाय्य केले जाईल. त्याचबरोबर राज्यातील प्रत्येक नागरिकाचा २५ लाखापर्यंतचा विमा काढला जाणार आहे. औषधेही मोफत देण्याच्या महत्त्वाचा निर्णयही महाविकास आघाडीने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर ५० टक्के आरक्षणाची मर्यादा उठवून त्यात वाढ करण्याचा आमचा प्रयत्न असल्याची ग्वाही अमित देशमुख यांनी दिला. त्याचबरोबर या निवडणुकीत लातूर जिल्ह्यातील सहाच्या सहा जागा महाविकास आघाडीला मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच येत्या २० तारखेला हाताच्या चिन्हाचे बटन दाबून बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

## माजी केंद्रीय गृहमंत्री मा. शिवराजजी पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतले आशीर्वाद

लातूर :– लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी माजी केंद्रीय गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल माननीय शिवराजजी पाटील चाकूरकर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर येथील देवघर या निवासस्थानी मंगळवारी सकाळी माजी केंद्रीय गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल माननीय शिवराजजी पाटील चाकूरकर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मा. चाकूरकर आणि आ. कराड यांच्या लातूर ग्रामीण आणि लातूर शहर या दोन्ही विधानसभा मतदार संघातील निवडणूक अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. याप्रसंगी लातूर शहर विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शैलेश पाटील चाकूरकर, अर्चनाताई यांचे जावई कुशाग्रह सिंग मुलगी रुद्राली पाटील, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, प्रदेश भाजपाचे शैलेश लाहोटी, पंचायत राज सेलचे नवनाथ भोसले, उद्योजक जगदीश कुलकर्णी, महेंद्र जाधवर यांच्यासह अनेक जण होते.



## केज विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये दुरंगी लढत

केज/प्रतिनिधी :– केज विधानसभेच्या प्रचारात महाविकास आघाडी व महायुती आघाडीवर तर मनसेचे इंजन पिछाडीवर असल्याचे मतदारातून बोलले जात आहे केज विधानसभेची निवडणूक ही तिरंगी लढत होणार असे वाटले होते परंतु केज विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये दुरंगी लढत होत असल्याचे मतदारसंघांमध्ये पाहावयास मिळत आहे व तशा मतदारांतून चर्चा देखील ऐकण्यास मिळत आहेत. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना दिवसांनी दिवस मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळताना दिसत आहे. पृथ्वीराज साठे हे गेले पाच वर्षापासून सतत केज मतदार संघातील गावागावात त नागरिकाशी संवाद साधत असल्यामुळे त्यांचा जनसंपर्क मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्यासोबत खासदार रजनीताई पाटील, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, डॉ.नरेंद्र काळे,माजी आमदार संगीताताई ठोंबरे, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सीताताई बनसोड, शेकापचे भाई मोहन गुंड,डॉ. अंजली घाडगे यांच्यासह शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी व काँग्रेसचे पदाधिकारी यांच्यासह महा विकास आघाडीतील घटक पक्ष सोबत आहे. तसेच पृथ्वीराज साठे यांना बऱ्याचशा अपक्ष उमेदवार यांनी देखील पाठिंबा दिलेला आहे आणि सर्वसाधारण नागरिक त्यांच्या सोबत आहे. महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते व त्यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा हे एक हाती प्रचाराची धुरा सांभाळताना पाहावयास मिळत आहे. नमिता मुंदडा व त्यांच्या कुटुंबावर भाजपातील एक गट नाराज असल्याचे दिसून येत होते परंतु नुकतीच भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांनी नाराज कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांचे नाराजी दूर केली आहे. नमिता मुंदडा यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या विकासाच्या जोरावर त्या मतदारसंघातील गावोगाव जाऊन मतदान मागत आहेत व मतदारांशी चर्चा करून संवाद साधत आहेत. त्यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे तर





महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश गालफाडे यांनी प्रचाराचा नारळ हा त्यांच्या जन्मभूमी साळेगाव येते फोडून प्रचारास प्रारंभ केला आहे रमेश गालफाडे हेही मतदारसंघातील गावागावात जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत परंतु त्यांना फारसा मतदारातून पाठिंबा मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे व नागरिकांतून चर्चाही ऐकण्यास येत आहे. रमेश गालफाडे हे साळेगावचे भूमिपुत्र असले तरी ते वास्तव्यास पुणे येथे असतात व ते एक मोठे व्यावसायिक आहेत. रमेश गालफडे संघटनेच्या माध्यमातून मतदार संघात अधून मधून तुरळक प्रमाणात कार्यक्रम घेऊन संपर्क साधत आहेत परंतु ते सतत मतदारसंघांमध्ये राहत नसल्यामुळे त्यांचा जनसंपर्क हा कमी प्रमाणात असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आजपर्यंत केव्हाच केज मतदार संघात आपला उमेदवार उभा केला नव्हता पहिल्याच वेळेस गालफाडे यांना उमेदवारी दिली आहे परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देखील केज मतदार संघामध्ये फारसे वर्चस्व नसल्याचे बोलले जात आहे तर त्यांचे उमेदवाराचा ही संपर्क कमी प्रमाणात असल्यामुळे गालफाडे यांची प्रचारामध्ये गती असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे केज विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे व महायुतीच्या उमेदवार नमिताताई मुंदडा यांच्यात दुहेरी लढत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या प्रचाराची रणधुमाळी ही शेवटच्या टप्प्यात आलेली असताना मनसेचे इंजन पटरीवर धावताना फारसे दिसून येत नाही असे ग्रामीण भागातील व शहरी भागातील मतदारातून बोलले जात आहे परंतु खरे चित्र निकालानंतर स्पष्ट होईल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल

## डंके की चोट पे सांगतो तुम्ही नमिताताई मुंदडा यांना निवडून द्या चार पदरी रस्ता चार महिन्यात करतो–नितीन गडकरी

केज/प्रतिनिधी :– केज विधानसभेच्या उमेदवार नमिताताई मुदडा यांच्या प्रचारार्थ रस्ते वाहतूक आणि महामार्ग केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी डंके की चोट पे सांगतो मी कधीच भुलथापा देत नाही तुम्ही नमिताताई मुंदडा यांना निवडून द्या मी चार महिन्यात चार पदरी रस्ता करून देतो असे उपस्थितांना आश्वासित केले. पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले की,महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांनी कधी जातिवाद केला नाही कोणतीही योजना देताना जात पाहिली गेली नाही सर्वांना समान योजना देऊन एक आदर्श निर्माण केला आहे. परंतु काही लोक दलितांना संविधान बदलण्याच्या भाषा करतात आम्ही संविधान बदलणारे नाहीत व बदलू ही देणार नाहीत असा ठाम विश्वास उपस्थितांना दिला आहे. तसेच मुस्लिमांना भाजपा हा मुस्लिम विरोधी आहे जातीवादी आहेत अशी भीती दाखवून मुस्लिमांचे मत घेऊन त्यांची फसवणूक केली जात आहे यामुळे सर्वांनी विकास करण्यासाठी विकासाला मत द्याव आशी




नम्र विनंती केली. तसेच पंकजाताई मुंडे म्हणाल्या की मी महाराष्ट्रभर प्रचार करत आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील केजची मी जागा दत्तक घेतलेली आहे यामुळे तुम्ही नमिता ताई अक्षय मुंदडा यांना निवडून आणा असे मत व्यक्त केले. व स्टेजवर बसलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांना हात जोडून विनंती केली की,नमिताताईला निवडून आणण्याची जबाबदारी आपल्यावर आहे मला दुसऱ्यांच्या सेवेसाठी जायचे आहे यामुळे आपण सर्वांनी ही निवडणूक तुमची आहे म्हणून रडायची आहे व नमिताताईंना निवडून द्यायचे आहे त्याचबरोबर ही निवडणूक माझ्या अस्मितेची नसून ही निवडणूक तुमच्या अस्मितेची आहे त्याकरिता आपण सर्वांनी मिळून नमिताताई मुदडा यांना निवडून द्यावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

### दुश्मन एकत्र येतात, तर आम्ही का नाही?

मुंबई : विशेष प्रतिनिधी राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील राजकीय वर्तुळात मोठा भूकंप झाला. त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष काढला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येण्याविषयी अनेकदा मराठी माणसांनी दोघांना अनेकदा साद घातली. पण पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं आहे. तरीही या दोघांच्या एकत्र येण्याचा विषय अधून–मधून राजकारणात येतोच. आता दस्तूरखुद्द मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या मुद्दावर त्यांचे मौन सोडले आहे. त्यांनी केलेल्या वक्तव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्याने जबरदस्त 'तडका' बसला आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# पैसा बोलता है

'भांडवल म्हणजे मृतश्रम, पण ते जिवंत माणसाचे श्रम पिऊन जगू शकते' ही भावनिक अर्थात सशक्त, सखोल आणि अर्थविषयक तात्विक भाषा कार्ल मार्क्स यांची आहे. अर्थात, काळे स्वरूपातील भांडवल याविषयी जगात सर्वात मोठी समस्या निर्माण होत आहे. काळे भांडवल मानवाचे जास्तीत जास्त शोषण करते, भांडवल अर्थात पैसा! अर्थव्यवस्थेत दोन प्रकारच्या पैशाचा वावर असतो, काळा पैसा आणि पांढरा पैसा. अविकसित देशांमध्ये काळ्या पैशाचा वापर जास्त प्रमाणात होतो. भारतात तीच परिस्थिती सध्या होऊन बसली आहे.

सार्वत्रिक निवडणुकांमध्ये देशात काळ्या पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, मग यातून सत्ता हाशील झाल्यानंतर परत काळ्या पैशाची निर्मिती होते. सत्ताधारी आपल्या सत्तेचा वापर करून काळ्या पैशांद्वारे जनतेवर नियंत्रण व अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करतात.

त्याबरोबरच स्वतःची खुर्ची अर्थात सत्ता टिकवण्याचाही आणि लोकप्रतिनिधी त्याचबरोबर पक्ष फोडून सत्तांतर करण्यासाठी काळ्या पैशामुळेच हातभार लागतो. हे अर्थचक्र चालूच असते. जगभरातील कोणत्याही नियोजनाची योजना फिकी पडावी अशी सध्याची भारतातील निवडणूक पद्धती आहे. कारण की यामध्ये काळ्या पैशाचा वापर सर्रास होतो.

काळ्या पैशाचा वापर सर्वात जास्त निवडणुकीच्या कालावधीमध्ये केला जातो. काही वस्तू वाटप स्वरूपात तर काही रोख स्वरूपात. हे वाटप एवढ्या कौशल्याने केले जाते की अनेक नियम व अडथळे यामधून त्यांची सुटका होते. अनेक मतदारांच्या हातापर्यंत ही 'वाटप' जाताना कोणाच्या कानाला खबर लागत नाही. ज्येष्ठ विचारवंत पिटी बर्मन म्हणतात, पैसा काही बाबतीत अग्नीसारखा असतो! तो एक अतिशय उत्कृष्ट सेवक आहे. पण कधी कधी तो महाभयंकरसुद्धा होतो.

महाभयंकर म्हणजे पैशाचा दुरुपयोग. अर्थातच घातक कृत्य करणे म्हणजे हे अग्नीपेक्षाही घातक आहेत. काळा पैसा याचा ढोबळ अर्थ असा की जो कायदेशीर व्यवहारात वापरला जात नाही, पण क्रियाकल्पाद्वारे कमवलेला पैसा त्याचा कोणताही कर भरला जात नाही, म्हणजे त्यातून सरकारला उत्पन्न मिळत नाही.

अर्थातच या पैशाची सरकार दरबारी नोंद नसते व बँकेतही ठेवला जात नाही. म्हणजेच अवैध मार्गाने कमवलेला पैसा काळा पैसा म्हणून किंवा काळे धन म्हणून संबोधला जातो. बर्याचदा तो रोख रकमेतच साठवला जातो. खंडणी/तस्करी/भ्रष्टाचार/लाच/पगडी/अनुदान/मदत/मनी लॉन्ड्रीग/ अमलीपदार्थांची तस्करी/ अर्थात उलाढाल अशा अनेक मार्गांनी काळा पैसा निर्माण होतो. सध्याच्या कालावधीत काळा पैसा निर्माण करण्यात राजकारणी आणि सरकारी नोकरशहा यांचा मोठा हात आहे.

सरकारी विकास योजना अंमलबजावणीसाठी कंत्राटदार मोठी रक्कम काळ्या पैशाच्या स्वरूपात राजकारणी व अधिकारी यांना देतात. सरकारी सार्वजनिक कंपन्या/खनिज तेल विक्री/ सरकारी बँकेमध्ये थकलेले थकीत कर्जाचे सेटलमेंट करण्यासाठी मोठमोठ्या रक्कम स्वीकारल्या जातात.

अवैधरित्या आणि नियमात सूट देऊन मोठ्या उद्योगपतीस परवानगी देऊन त्यात निर्मित झालेला काळा पैसा राजकारणी अर्थात राजकीय पक्ष हे संकटकाळी वापरतात. खासगी व्यावसायिक सर्व उत्पादनाचे स्त्रोत जाहीर न करता स्वतः बेहिशेबी मालमत्ता व रोकड ठेवतात. अनिवासी भारतीय व काही भारतीय टॅक्स हेवन देशात गुंतवणूक करून करोडो रुपयांची करबुडी करतात.

स्वीस बँकेत अनेक वर्षांपासून भारतीयांचा काळा पैसा पडलेला आहे, त्याचा वापर निवडणुकीच्या वेळी केला जातो. तर डळमळीत सरकारला स्थिरपणा आणण्यासाठी पैशाचा घोडा बाजार करून वापर केला जातो. हे काळ्या पैशाचे स्वरूप आहे. भारतीय लोकशाहीच्या निवडणूक खर्चाच्या मर्यादा ओलांडून खर्च होत आहे. मर्यादेपेक्षा अनेक पटीमध्ये खर्चाचे व्यवहार चालतात. निवडणूक प्रचार यंत्रणेचा खर्च, त्याचबरोबर मोठमोठ्या सभेचा खर्च आणि प्रसिद्धी माध्यमात देण्यात येणारे करोडो रुपये याची मोजदाद करणे अवघड आहे.

हे सामाजिक सत्य आहे. मतदाराला आश्वासने व थोडीशी चिरीमिरी देण्यात येते. त्यामुळे आज तरी देशात नागरिकाची पंख छाटलेल्या पक्ष्यासारखी अवस्था झाली आहे. पंख निघूनही दाणे खावेच लागतात. एक दिवस परत बळी! असले प्रकार सर्रास दिसून येतात. काळ्या पैशाचा सुळसुळाट देशाच्या आर्थिक वाढीवर म्हणजे देशाच्या विकासावर परिणाम करतो, सरकारचा महसूल बुडतो, बँकांमध्ये ठेवी कमी होऊन गरीब व उद्योजकास कर्ज मिळत नाही.

ज्या देशात काळा पैसा जास्त त्या देशाची आर्थिक प्रगती खुंटते व तो देश रसातळाला जातो, हा अर्थशास्त्राचा नियम आहे. काळ्या पैशामुळे तस्करी/गुंडगिरी/गुन्हेगारी/भ्रष्टाचार असे अपकृत्यं निर्माण होतात. सरकारी यंत्रणा भ्रष्ट होते/वस्तूच्या किमती वाढतात, मग त्याचा ताण गरिबांच्या खिशावर पडतो.

काळा पैसा असला आणि त्याच्यावर कर भरला तर तो पांढरा होतो. कर नाही भरला तर काळा पैसा, असे आपण म्हणू शकतो. केवळ कर भरण्यामुळे काळाचा रंग पांढरा होतो. नोटबंदीमध्ये जवळील काळ्या पैशाची रोख रक्कम बँकेत भरल्याबरोबर अर्थात हिशेबात आल्याबरोबर तो लगेच पांढरा! काही वर्षांच्या कालखंडानंतर सरकारच्या काळा पैसा व संपत्ती रोखण्यासाठी ऐच्छिक प्रगटीकरण योजना येणे आवश्यक आहे. बेकायदेशीरपणे पैसा न कमावण्याचा मार्ग स्वीकारणे, असा नागरिकांनी संकल्प करणे गरजेचे आहे. बेकायदेशीर करबुडी व काळा पैसा यास कारणीभूत असणार्यास कठोर शिक्षा अपेक्षित आहे.सध्याच्या कायद्यातील त्रुटी दूर करून नवीन कठोर कायदे करणे नितांत गरजेचे आहे. सत्य परिस्थितीचे आकलन करून स्वतः नागरिकांनी बदल घडवून आणणे, हाच आजच्या काळातील उपाय आहे, नाहीतर देश संकटखाईत ओढला जाईल. संत तुकाराम महाराज म्हणतात जोडोनिया धन उत्तम वव्हारे । उदास विचारे वेच करी ।। याचा अर्थ असा आहे की, उत्तम प्रामाणिक व्यवहार करून धन जोडणे चांगले. नीच व दोन नंबरच्या व्यवहारात कधीही समाधान मिळत नाही. उत्तम धंदा/ व्यवसाय याने धन कमावले, तर त्याचा विनियोग चांगला होतो. योग्य मार्गाने पैसा खर्च करून खर्च करताना प्रसन्न मनाने करा! अर्थात, उदासीनता कोणतीही नको. त्याचबरोबर अशा मनुष्यास उत्तम मिळून सुख लाभते.

# इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठेतील चीनचा वाटा कमी

सरलेल्या ऑक्टोबरमध्ये देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी सुमारे एक लाख कोटी रुपये मूल्याचे समभाग खरेदी केले. तर याच काळात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याच्या समभागांची विक्री केली. अलीकडील म्युच्युअल फंडांच्या माध्यमातून सुरू असलेली समभाग खरेदी ही भांडवल बाजारातील मूलगामी बदल दर्शवणारी आहे.

हा कल घसरत्या बाजाराला सावरून कंपन्यांच्या समभागांचे मूल्यांकन योग्य पातळीवर राखण्याचे कार्य करील. तर परदेशी गुंतवणूकदारांकडून समभाग विक्रीमुळे बाजारात चढ-उतार असूनही, बाजाराला आवश्यक स्थैर्य प्रदान करेल, असे शेअर बाजार विश्लेषकांचे मत आहे. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून असलेला निधी प्रवाह हा मुख्यतः विमा आणि सेवानिवृत्ती निधींसह म्युच्युअल फंडातील 'एसआयपी' योगदानाचा परिणाम आहे. चालू नोव्हेंबर महिन्यात एसआयपीचा ओघ कमी होऊ शकतो.



परंतु सेवानिवृत्ती निधीचा प्रवाह मजबूत राहण्याची आणि वाढत राहण्याची शक्यता आहे. सध्या सुरू असलेला सणासुदीचा हंगाम, उत्तम पाऊसपाणी आणि ग्रामीण मागणीतील वाढ हे घटक नजीकच्या काळात बाजारासाठी प्रेरक ठरू शकतील. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांत भाजपप्रणीत एनडीएला यश मिळाल्यास, भांडवली बाजारात मोठी तेजी येईल, असा अंदाज आहे. दुसरीकडे, अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने व्याज कपात केली असून, त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांचा ओघ परत भारताकडे वळणार, हे नक्की आहे. फेडरलने सलग दुसर्यांदा व्याजदरांना कात्री लावली आहे. अमेरिकेतील चलनवाढीची परिस्थिती आता आटोक्यात येऊ लागली असल्यामुळेच हे पाऊल उचलण्यात आले आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांची निवड झाली असून, ते भारतातून आयात केल्या जाणार्या अनेक वस्तूंवर कर लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु चीन हा त्यांच्या रडारवर आहे. आपल्या मागच्या टर्ममध्येही ट्रम्प यांनी चीनशी व्यापारयुद्ध (ट्रेड वॉर) सुरू केले होते. त्याची पुनरावृत्ती झाल्यास, भारतासाठी संधी उपलब्ध होतील.

डिसेंबरमध्ये देखील व्याजदरांना कात्री लावण्याबाबत फेडरल रिझर्व्ह विचार करू शकते, असे त्याचे प्रमुख जेरोम पॉवेल यांनी म्हटले आहे. अमेरिकेत नव्या अध्यक्षाने पदग्रहण केले तरी तो फेडरल रिझर्व्हच्या प्रमुखांना काढू शकत नाही. आपण राजीनामा देणार नसल्याचे पॉवेल यांनी अगोदरच स्पष्ट केले आहे. मात्र जेव्हा व्याजाचे दर घटतात, तेव्हा व्यापारी व उद्योजकांचा कर्जउभारणीवरील खर्च कमी होतो. त्यामुळे उत्पादनखर्चात कपात होते व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकण्याची ताकद निर्माण होते.

म्हणूनच व्याजदर घटीचा अमेरिकेला फायदा होणार आहे. तेथील बेरोजगारीही घटणार आहे. त्याचवेळी स्थलांतरितांवर नियंत्रणे तसेच काही वस्तूंवरील करवाढ, यामुळे अमेरिकेतील चलनवाढ पुन्हा वाढू शकते, अशी भीती अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत. ट्रम्प यांची संरक्षक धोरणेही जागतिकीकरणविरोधी असून, भारताच्या दृष्टीने ती घातकदेखील ठरू शकतात.

याचे कारण, आज जागतिक पुरवठा साखळीत (ग्लोबल व्हॅल्यू चेन) भारत एक महत्त्वाचा हिस्सा आहे. परंतु भारतातून येणार्या आयात मालावर जादा कर लादण्यात आल्यास किंवा मालाच्या आयातीवर संख्यात्मक निर्बंध आल्यास, त्याचा भारतात फटका बसू शकतो. उच्च कर आणि व्यापार युद्धामुळे अमेरिकेत उद्या चलनफुगवट्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यातच अमेरिकेची तूट वाढली तर आणि तेथील अर्थ संस्थांच्या स्वायत्ततेवर आक्रमण झाल्यास, अमेरिकेत होणार्या गुंतवणुकीस फटका बसू शकेल. अमेरिकेत आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास, भारतीय रिझर्व्ह बँकेलादेखील व्याजदराबद्दल वेगळा विचार करावा लागेल. डिसेंबर २०२४ नंतर व्याजदर कपात होऊ शकते, असे सूतोवाच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केले आहे. परंतु त्यांनाही ट्रम्प यांची धोरणे लक्षात घेऊनच आपली धोरणे आखावी लागतील. किमान पुढील वर्षात भारतात व्याजदरात घसरण झाल्यास, त्याचा भारताच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे. अगोदर सप्टेंबर २०२४ मध्ये संपलेल्या तिमाहीत भारतातील बड्या कंपन्यांच्या विक्रीत घट दिसून असून, त्यामुळे त्यांच्या ऑपरेटिंग नफ्यात केवळ सहा टक्क्यांची वृद्धी झालेली आहे.

बजाज ऑटो, अल्ट्राटेक सिमेंट, गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट, पिडिलाइट, पॉलीकॅब या कंपन्यांनी गुंतवणूकदारांचा अपेक्षाभंग केला आहे. अमेरिकेने हळूहळू चीनऐवजी अन्य देशांकडे आपला मोर्चा वाढवण्यास सुरुवात केली आहे. ट्रम्प यांच्या कारकिर्दीत चीनमधून होणार्या आयातीवर कुर्हाड कोसळणार आहे. अशावेळी या गोष्टीचा भारताने फायदा घेतला पाहिजे. गेल्या सात वर्षांत जागतिक इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठेतील चीनचा वाटा कमी कमी होत चालला आहे.

केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहनामुळे अमेरिकेतील इलेक्ट्रॉनिक्स आयातीतील भारताचा वाटा आता दोन टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. परंतु अन्य क्षेत्रांमध्ये भारताला असे यश मिळवता आलेले नाही. उलट व्हिएतनाम, मलेशिया, थायलंड, तैवान या देशांनी निर्यातीत घोडदौड केली आहे. बांगलादेशातील सत्तांतरानंतर तेथील वस्त्रोद्योगास फटका बसू शकतो. त्याचाही भारताने जास्तीत जास्त लाभ उठवून, जागतिक वस्त्रपेठ काबीज केली पाहिजे.

# मधुमेह असाध्य आजार, निगा राखा!

मधुमेह या आजाराबद्दल जनजागृती करण्यासाठी १४ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मधुमेह दिवस म्हणून जगभरामध्ये साजरा केला जातो. जागतिक मधुमेह दिनाची स्थापना आंतरराष्ट्रीय मधुमेह प्राधिकरण या संस्थेद्वारे १९९१ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने ही संकल्पना राबविण्यात आली आणि २००६ मध्ये युएन ठराव ६१/२२५ अंतर्गत अधिकृत संयुक्त राष्ट्र दिवस बनला. १४ नोव्हेंबर हा दिवस १९२२ मध्ये चार्ल्स बेस्टसह इन्सुलिनचे सह-शोधक सर फ्रेडरिक बँटिंग यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ निवडण्यात आला. सर बँटिंग यांच्या शंभराव्या जन्मदिनादिवशी जागतिक मधुमेह दिवस या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

नीलवलय हे जागतिक मधुमेह दिवसाचे संबोधचिन्ह म्हणून ठरवण्यात आले. मधुमेह या आजाराविरुद्ध सामाजिक मोहिमेमध्ये सर्वांनी एकत्रितपणे सहभागी होणे, या संदेशाचे हे चिन्ह द्योतक आहे. मधुमेह हा चयापचयसंबंधित विकार आहे. हा चिरकालीन आजार आहे म्हणजेच हळूहळू विकसित होतो. यामध्ये रक्तातील शर्करेमध्ये आवश्यकतेपेक्षा अधिक वाढ दिसून येते. जागतिक मधुमेह दिनानिमित्त आयोजित मोहिमा ब्लू सर्कल लोगो ने दर्शविल्या जातात, जे २००७ मध्ये संयुक्त राष्ट्राने अधिकृतपणे मान्यता दिल्यानंतर लगेचच प्रेरित केले गेले होते आणि तेव्हापासून ब्लू सर्कल हे मधुमेह जागरूकतेचे जागतिक प्रतीक मानले जाते आणि सूचित करते. मधुमेहाच्या वाढत्या प्रकरणांचा सामना करण्यासाठी जागतिक मधुमेह समुदायांची युती.

मधुमेह प्रकार-१ हा प्रामुख्याने अल्पवयीन गटातील व्यक्तींमध्ये दिसून येतो. यामध्ये इन्शुलीनच्या उत्पादनात घट दिसून येते. प्रकार-१ हा प्रतिबंधात्मक नाही, परंतु अंतःक्षेपणाद्वारे त्याचे नियंत्रण करता येते. तर मधुमेह प्रकार-२ मध्ये स्वादुपिंडाद्वारे तयार झालेले इन्शुलीन शरीरातील पेशींद्वारे योग्य प्रमाणात वापरले जात नाही. दीर्घकालीन मधुमेहामुळे अंधत्व, वृक्क निष्क्रियता, हृदय विकार असे आजार उद्भवण्याची शक्यता असते. संतुलित आहार, नियमित शारीरिक व्यायाम, नियंत्रित वजन आणि धूम्रपान निषेध यांद्वारे मधुमेह या आजाराला प्रतिबंध घालता येतो.

जागतिक मधुमेह दिवसाचा प्रसार करण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रम आणि मधुमेह तपासणी शिबिर यांचे आयोजन केले जाते. तसेच विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. निळ्या रंगाचे कपडे परिधान करून मिरवणूक किंवा सामूहिक व्यायामांचे आयोजन केले जाते. जागतिक मधुमेह दिवसानिमित्त रूपरेखा आखल्या जातात, त्यांपैकी काही महत्त्वाच्या रूपरेखा जसे, सुरक्षित भविष्य : मधुमेहसंबंधी शिक्षण आणि प्रतिबंध (२०१३); आरोग्यपूर्ण आहार (२०१५); स्त्रिया आणि मधुमेह : आरोग्यपूर्ण भविष्य, आपला अधिकार (२०१७); कुटुंब आणि मधुमेह (२०१८-१९). आंतरराष्ट्रीय मधुमेह प्राधिकरणाने २०२० सालाकरिता 'परिचारिका आणि मधुमेह' ही रूपरेखा ठरवली आहे. यानुसार मधुमेहग्रस्त व्यक्तींच्या देखभालीमध्ये परिचारिकांच्या भूमिकेबद्दल जागृती करण्यात येणार आहे.

यावर्षी जागतिक मधुमेह दिनाची थीम आहे ब्रेकिंग बॅरियर्स, ब्रिजिंग गॅप्स. ही थीम मधुमेहाचा लोकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकते. हे प्रभावी मधुमेह व्यवस्थापनाचे महत्त्व आणि ते लोकांच्या जीवनाची गुणवत्ता कशी सुधारू शकते यावर देखील जोर देते. डब्ल्यूएचओ आणि इतर संस्थेच्या एकत्रित प्रयत्नांना साध्य करण्यासाठी मधुमेह शिक्षण वाढविण्यासाठी चांगल्या संधी, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य सुलभ करण्यासाठी लोकांना त्यांच्या सार्वजनिक आरोग्य सेवा संस्था आणि इतर जागतिक संस्थांना आग्रह करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी या विषयाचा हेतू देखील आहे. २०३० पर्यंत मधुमेह कव्हरेजचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी, मधुमेहाने ग्रस्त ८०% लोकांचे निदान, निदान झालेल्या ८०% लोकांचे ग्लायसेमिया आणि रक्तदाब यावर चांगले व्यवस्थापन असावे, ६०% लोकांकडे (४० वर्षे आणि त्याहून अधिक) स्टॅटिन (रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करणाऱ्या औषधांचा गट) उपलब्ध असणे आवश्यक आहे. १००% टाईप १ डायबिटीज बाधित लोकांना इन्सुलिन आणि योग्य रक्तातील ग्लुकोज स्व-व्यवस्थापन सुविधा सहज उपलब्ध असावी, हे समाविष्ट आहे.

इंटरनॅशनल डायबिटीज फाऊंडेशनच्या मते असा अंदाज आहे की सुमारे ५४.१ कोटी प्रौढांना टाईप २ मधुमेह होण्याचा धोका आहे, जे त्यांना शिक्षित करण्यासाठी जागरूकता कार्यक्रम आणि गुणवत्तापूर्ण मधुमेह शैक्षणिक प्लॅटफॉर्मचा प्रचार करून धोका कमी करण्यासाठी जगभरातील सर्वात चिंतेचा विषय बनला आहे. मधुमेहाचे प्राथमिक अवस्थेत व्यवस्थापन आणि प्रतिबंध करण्यासाठी. योग्य जीवनशैलीच्या सवयी, आहाराचे योग्य व्यवस्थापन (ग्लायसेमिक इंडेक्स ५० पेक्षा कमी किंवा त्यापेक्षा कमी असलेला आहार) याने टाइप २ मधुमेह टाळता येतो आणि त्याचे व्यवस्थापन करता येते. टाइप २ मधुमेह ही एक अशी स्थिती आहे जिथे इन्सुलिन पुरेशा प्रमाणात तयार होत नाही आणि कार्यक्षमतेने वापरले जात नाही (ज्याला इन्सुलिन प्रतिरोध देखील म्हणतात), जी शिस्तबद्ध जीवनशैली, स्वतःचे निरीक्षण आणि रक्तातील साखरेच्या चढउतारांवर लक्ष ठेवून, डॉक्टरांशी नियमित सल्लामसलत करून पुनर्संचयित केली जाऊ शकते.

मधुमेह नियंत्रित करण्यासाठी असे काही प्रतिबंधात्मक टिप्स आहेत. जसे साखर आणि परिष्कृत कार्बोहायड्रेट्सचे सेवन टाळावे, एका वेळी जेवणाचा थोडासा भाग खाण्याचा सराव करावे, ग्लायसेमिक इंडेक्स कमी असलेले फायबर आणि अन्न समाविष्ट करावे, धूम्रपान सोडा ज्यामुळे इन्सुलिन प्रतिरोधक शक्ती वाढते, दिवसातून किमान ३० मिनिटे नियमित व्यायाम करण्याची सवय लावावे, तुमच्या रक्तातील कोलेस्टेरॉलच्या पातळीवर लक्ष ठेवा (आदर्श २०० च्या खाली असावे). एलडीएल (लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन) १०० च्या खाली, एचडीएल (हाय-डेन्सिटी लिपोप्रोटीन) २० च्या वर आणि ट्रायग्लिसराइड्स १५० च्या खाली, तुमच्या रक्तदाबाचे योग्य व्यवस्थापन करा जे १३०/८० किंवा त्याहून कमी असावे, एरेटेड पेये आणि साखरेसह इतर पेये घेणे टाळावे ज्यामुळे टाइप २ मधुमेहाचा धोका वाढू शकतो, सामान्य पाणी पिण्याची सवय लावावी, मधुमेह नियंत्रण प्रतिबंधात्मक टिपांसह अद्यतनित व्हावे, गरजूंपर्यंत जनजागृती करण्यासाठी मधुमेहाशी संबंधित मोहिमेचा प्रचार आणि प्रोत्साहन द्यावे.

मधुमेह असलेल्या लाखो लोकांना त्यांच्या घरी, कामावर आणि शाळेत त्यांची स्थिती व्यवस्थापित करण्यासाठी दररोज आव्हानांचा सामना करावा लागतो. ते लवचिक, संघटित आणि जबाबदार असले पाहिजेत, ज्यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. मधुमेहाची काळजी बहुतेकदा फक्त रक्तातील साखरेवर केंद्रित असते, ज्यामुळे अनेकांना भारावून टाकले जाते. हा जागतिक मधुमेह दिन, मधुमेह काळजीच्या केंद्रस्थानी निरोगीपणा ठेवू या आणि मधुमेहाच्या चांगल्या जीवनासाठी बदल सुरू करू या.

*************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# सौ. संजीवनीताई कराड यांचा झंझावती प्रचार दौरा महायुतीचे आ. कराड यांना मताधिक्य मिळवून देणार

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात महायुतीच्या प्रचारार्थ ग्रामीण भागातील गावागावात सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या प्रचार दौऱ्याला महिलांचा अभूतपूर्व मोठा प्रतिसाद मिळत असून प्रत्येक ठिकाणी महिलांशी संवाद करून मतदारांच्या मनातील भावना व्यक्त करत आहेत. या झंझावती दौऱ्यामुळे निश्चितपणे महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांना निश्चितपणे मताधिक्य मिळवून देण्यास मोठे योगदान ठरणार आहे.





भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचारानिमित्त भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड या गावोगाव जाऊन महिलांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या या दौऱ्याला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. रेणापूर तालुक्यातील मौजे घनसरगाव, कामखेडा, वाला, तत्तापूर, पळशी, लखमापूर, मोरवड, चाडगाव, बिटरगावतांडा, बिटरगाव, फरतरतांडा, फरतपूर, मोटेगाव आणि वांगदरी या गावात महिलांच्या बैठका झाल्या प्रत्येक ठिकाणच्या बैठकीला महिलांची मोठी उपस्थिती होती एकूणच महायुती शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे महिलात मोठे उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसून आले. यावेळी महायुतीला साथ देणार रमेशआप्पांना निवडून आणणार असेच महिला बोलत होत्या.

या दौऱ्यात सौ. संजीवनीताई कराड यांच्या समवेत भाजपा महिला आघाडीच्या अयोध्या आंबेकर, ललिता कांबळे, अँड राधिका पाटील, पार्वतीताई सोमवंशी, विद्याताई आकनगिरे, अनुसया फड, शीला आचार्य, मनीषा मुंडे यांच्यासह डॉ. बाबासाहेब घुले, विजय गंभीरे, शरद दरेकर, अंतराम आलापुरे, संतोष चव्हाण, अजित पाटील, अजय गुडे, आप्पासाहेब पाटील, प्रवीण गंभीरे, भाऊसाहेब गाडे, भगवान वाकडे, धनंजय पवार, कार्तिक गंभीरे, श्रीमंत नागरगोजे, शिवाजी सोमवंशी, अनंत सरवदे, दिलीप पाटील यांच्यासह अनेक जण होते.

राज्यातील माहिती शासनाने लाडकी बहीण यासह महिलांसाठी सुरू केलेल्या विविध योजनांची माहिती सांगून ठिकठिकाणी आयोजित बैठकीत उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना सौ. संजीवनीताई कराड म्हणाल्या की, मतदारसंघातील गावागावात वाडी वस्तीत शासनाचा निधी विविध योजनेच्या माध्यमातून रमेशआप्पानी मिळून दिला. काँग्रेसची पंधरा वर्षे पाहिली आता आप्पांच्या माध्यमातून भाजपाला केवळ पाच वर्षे देऊन बघा निश्चितपणे प्रत्येक गावच्या विकासाला गती मिळाल्याशिवाय राहणार नाही. महायुती शासनाने सुरू केलेल्या विविध योजना या पुढील काळातही सुरू ठेवण्यासाठी आणि आपल्या गावच्या सर्वांगीण विकासासाठी कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून आ. रमेशआप्पा कराड यांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

## पंकज त्रिपाठी मसाला चहामध्ये टाकतात तमालपत्र! चहामध्ये तमालपत्र घालावे का? तज्ज्ञांकडून जाणून घ्या फायदे

पंकज त्रिपाठी यांची अभिनयाची शैली तर वेगळी आहेच, पण त्यांची चहा बनवण्याची पद्धतही वेगळी आहे. स्त्री २ अभिनेता, ज्याला त्याच्या मसाला चहाबरोबर पोहे खायला आवडतात. पॉडकास्टर प्राजक्ता कोळीला वरील शोदरम्यान त्यांनी सांगितले, माझा चहा खास आहे मी माझा मसाला चहा एका खास पद्धतीने बनवतो. मी त्यात तमालपत्र घालतो. तमालपत्र असलेला हा चहा खरोखर छान आहे. मला माझ्या चहाबरोबर पोहे आवडतात. पंकज त्रिपाठी यांची मसाला चहाची रेसिपी तमालपत्र वगळून सर्व मसाले (वेलची, काळी वेलची, लवंग, बडीशेप, काळी मिरी आणि दालचिनी) एकत्र करा, मिक्सरमध्ये अथवा खलबत्त्यात बारीक वाटून घ्या. पाणी उकळायला लागले की तमालपत्रासह वाटलेला चहाचा मसाला टाका चवीनुसार साखर आणि दूध घाला. तुम्ही तुमच्या चहामध्ये तमालपत्र घालावे का? चहामध्ये तमालपत्र टाकण्याचे फायदे मसाला चहामध्ये तमालपत्र टाकणे सुरक्षित आहे आणि त्यामुळे पचन आणि प्रतिकारशक्तीला फायदा होऊ शकतो. तमालपत्रामध्ये सिनोल आणि युजेनॉल यांसारखी आवश्यक तेले आणि संयुगे असतात, ज्यात अँटिऑक्सिडेंट, दाहकविरोधी आणि पाचक गुणधर्म असतात. चहामध्ये टाकल्यानंतर तमालपत्र ही संयुगे त्यात सोडतात, ज्यामुळे चहाची चव वाढते आणि आरोग्यदायी फायदेही मिळतात, असे हैदराबादचे एलबी नगर, येथील ग्लेनेगल्स अवेअर हॉस्पिटल, मुख्य आहार तज्ज्ञ डॉ. बिराली स्वेथा म्हणाले.

याबाबत जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ सुषमा पीएस यांनी सहमती दर्शवली आणि सांगितले की, तमालपत्र पचन आणि गॅस कमी करण्यास मदत करते. उकळताना पाण्यात एक किंवा दोन तमालपत्र टाका. सर्व्ह करण्यापूर्वी त्यांना काढून टाका, असे सुषमा म्हणाल्या.

# लहान बाळांचा आहार कसा असावा?

मी जेव्हापासून डाएट फॉलो करतेय तेव्हापासून माझी मुलंसुद्धा तसंच खाऊ लागलीयेत. ऋचा आनंदाने सांगत होती. त्यांना डब्यात बीटच्या पोळ्या, पालक पराठे, तेलची चटणी असं सगळं डब्यात नेऊ लागलीयेत. आईचं खाणं मुलांना आपलंसं वाटतंय.

दर आठवड्याला आईस्क्रीमसाठी हट्ट करणारी मीरा सध्या डाळिंब कोशिंबिरीच्या प्रेमात आहे आणि अलीकडे पालेभाज्या खाऊ लागलीये. चॉकलेट्स पण बंद झालीयेत.



ऋचाच्या आवाजात कौतुक होतं. लहान मुलं आणि त्यांचं खाणं हे अनेक नवमातांसाठी वेगळं आव्हान असतं. आहारशास्त्रातील बदलत्या संशोधनानुसार मुलांना लहानपणापासून दिलं जाणारं खाणंदेखील बदललेलं आहे, त्याविषयी

आहाराचे संस्कार घरातूनच लहान मुलांच्या आहाराबाबत सगळ्यात महत्वाची गोष्ट असते ते म्हणजे त्यांची आहाराची बदलती गरज. वाढत्या वयानुसार आहारातून मिळणाऱ्या ऊर्जेचं प्रमाण वाढत जातं. त्यांच्यावर आहाराचे संस्कार घरातूनच सुरू होतात. एखाद्या पदार्थाची निवड, आहारातील वेगेवेगळे समज–गैरसमज यांची सुरुवात घरापासून होते, त्यामुळे पालक म्हणून आहाराबाबत सजग असणं आवश्यक असतं. लहान मुलांच्या आहारातील तक्रारी अनेकदा लाडीक स्वरात सांगितल्या जातात

त्याला पालेभाज्या आवडतंच नाहीत आईस्क्रीम खाल्ल्याशिवाय त्याचं जेवणचं पूर्ण होत नाही

ती फक्त भातच खाते या लाडीक तक्रारीतून मुलांना बाहेर काढून सकस आहाराचं महत्त्व समजावणं आवश्यक असतं. किडलेले दात लहान मुलांच्या आहारशैलीवर पालकांचा होणार परिणाम सांगताना आणखी एक किस्सा आठवतोय. २०२० साली सहा वर्षाच्या आद्याला तिचे पालक माझ्याकडे घेऊन आले होते. तिचे सगळे दात वेगेवेगळ्या रंगाचे होते. तिचे दुधाचे दात पूर्णपणे किडल्यामुळे दंतवैद्यानी सगळे दात काढून नवे रंगीत दात बसवून दिले होते. तिला पूर्णवेळ फक्त द्रव पदार्थ खाण्याची अटकळ असल्यामुळे तिचे पालक आहारात काय काय हवंय याचा सल्ला घेण्यासाठी आले होते. तिच्या दातांबद्दल सांगताना मिहीर त्रासून म्हणाला कसं काय माहीत माझी कोक प्यायची सवय इतकी पटकन लागली तिला. पाण्याऐवजी फक्त कोक आणि पेप्सी इतकंच प्यायची, त्याने एवढं नुकसान होईल वाटलं नव्हतं.

सकस आहाराचं नियोजन मिहीर हे सांगताना आद्याच्या आईच्या– स्वातीच्या डोळ्यात मात्र पाणी होतं. तरी मी तुला सांगत होते. तिच्यासमोर कोक पेप्सी नको. पण माझं ऐकशील तर खरं. रोज चॉकलेट, जेवल्यानंतर चॉकलेट शेक, पाणी तर नकोच असतं तिला. स्वाती नाराज स्वरात म्हणाली. आणि लहानखुरी आद्या तिच्या विश्वात मात्र हे सगळंच नवीन होतं. आपले दात तर रंगीत आहेत, हे वेगळं आहे. पण नेमकं काय चुकलंय याबद्दलच निरागस कुतूहल होतं. तिच्या आहारातील बदल सुचवताना फक्त स्ट्रॉ वापरण्याचा सल्ला असल्यामुळे सकस आहाराचं नियोजन करणं थोडं आव्हानात्मक होतं. वाढीसाठी पोषक आहार आद्याचं उदाहरण पाहता लहान मुलांच्या आहारात केवळ फॅड म्हणून नव्हे तर सवय म्हणून सकस आहाराची सुरुवात पालकांपासून व्हायला हवी, हे अधोरेखित होत राहतं. पाश्चात्त्य जीवनशैली अंगिकारताना आपल्या आजूबाजूला सहज उपलब्ध असणाऱ्या अन्नपदार्थांबद्दल त्यांच्या आहारातील वापराबद्दल आपण आग्रही असायला हवं. लहान मुलांच्या वाढीसाठी पोषक आहार आवश्यक आहे, म्हणजे नेमकं कसं ते जाणून घेऊ. पण नेमकं कशासाठी हे आधी जाणून घेऊया.

वाढतं वजन हे परिमाण नवजात अर्भकाचा वजन पहिले ६ महिने ते एक वर्षापर्यंत वाढतं. या वयात पोषक तत्त्वांची आवश्यकता इतर कोणत्याही वयोगटापेक्षा अधिक असते. आईच्या दुधामधून आवश्यक संप्रेरके, प्रथिने यांचा पुरवठा होतोच . मात्र जेव्हा मूल हळूहळू अन्न पदार्थ खायला शिकतं, तेव्हा त्यांच्या आहारात कॅल्शिअम, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, लोह, झिंक, व्हिटॅमिन्स (पोषणमूल्यं) आणि खनिजे यांचे प्रमाण उत्तम असणे आवश्यक असते. बाळाची रोगप्रतिकारशक्ती वाढणे, हाडांची वाढ होणे, मेंदूला चालना मिळणे, ऊर्जेचा भरपूर पुरवठा होत राहणे, शरीरातील पेशींची वाढ उत्तम होणे आणि पेशींचे आरोग्य उत्तम राहणे यासाठी आहार महत्वाचा आहे. बाळाचे आरोग्य उत्तम असण्याचं एक परिमाण म्हणजे बाळाचं वाढतं वजन! पहिल्या सहा महिन्यात सरासरी ६ ते ८ किलो आणि एक वर्षापर्यंत सरासरी ११ किलोग्रॅम इतके वजन वाढणे अपेक्षित असते. अर्थात त्यासाठी आईचा आहारदेखील तितकाच महत्वाचा असतो.

वाढीव साखर वजा करा सहा ते आठ महिन्यांनंतर बाळाच्या आहारात आईच्या दुधाव्यतिरिक्त आहार ठरविताना स्निग्ध पदार्थ, प्रथिने यांचं आहारातील उत्तम प्रमाण बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचं ठरतं. पहिले दोन वर्षे कोणत्याही प्रकारची साखर आहारातून वजा करणं पोषक मानलं जातं. भारतीय आहारात कर्बोदकांचं प्रमाण उत्तम आहे. त्यामुळे वाढीव साखर बाळाच्या आहारातून वजा केल्यास आणि नियमित आहारातून म्हणजेच भरडी, दूध–धान्ये , शिकरण, भाज्यांचे कढण अशा प्रकारचा आहार ठेवल्यास बाळाला विविध प्रकारचे अन्न आणि विविध चवींचे अन्न आहारात समाविष्ट करणं सोपं जाऊ शकतं.

## घसा खवखवतोय, सर्दीसुद्धा झाली आहे? मग सकाळच्या कॉफीऐवजी 'या' पेयाने करा तुमच्या दिवसाची सुरुवात

जसजसे हिवाळ्याचे महिने सुरू होतात, तसतसे सर्दी, घसा खवखवणे सुरू होते. झोपेतून उठल्यावर नाक बंद आणि घशात खरखरीत वाटणे अशा अनेक समस्या जाणवू लागल्या आहेत. पण, असे जाणवल्यास संपूर्ण दिवस खूप थकल्यासारखे होते. मग अशा वेळी सकाळी दिवसाची सुरुवात कॉफीने करण्याऐवजी एक कप लिंबू अन् लवंगाचे कोमट पाणी पिऊन बघा. खोकला आणि सर्दीसाठी हा एक घरगुती उपाय आहे; ज्याचे फायदे तुम्हाला आश्चर्यचकित करू शकतात. हे साधे पेय सर्दीच्या लक्षणांपासून मुक्त करण्याप्रमाणेच वजन व्यवस्थापनासही साह्यभूत ठरू शकते का याबद्दल जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने एमजीएम हेल्थकेअरच्या प्रमुख आहार तज्ज्ञ व आरोग्य तज्ज्ञ विजयश्री एन. यांच्याशी चर्चा केली. पण लिंबू आणि लवंगच का? लिंबू त्याच्यामधील क जीवनसत्त्वासाठी ओळखला जातो, जो रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे श्वसनमार्गातील श्लेष्मा सैल करून, तो बाहेर काढण्यास मदत करतो . तर दुसरीकडे, लवंगात दाहकविरोधी गुणधर्म असतो. त्यात युजेनॉल, गॅलिक सिड यांसारखी संयुगे असतात, जी अँटिऑक्सिडंट्स म्हणून काम करतात आणि पेशींचे आरोग्य टिकवून ठेवण्यास मदत करतात, असे विजयश्री म्हणाल्या आहेत. विजयश्री यांनी असेही सांगितले की, लवंगेमुळे खोकला कमी होऊन, श्वासोच्छ्वास घेण्यास मदत होते. तसेच श्वसनमार्ग साफ करण्यासही त्याचा लाभ होतो. त्यामुळे शांत झोपेला प्रोत्साहन मिळते. एकंदरीत सर्दी आणि खोकल्यामध्ये लवंग फायदेशीर ठरते. सकाळी कॉफीऐवजी लिंबू, लवंगयुक्त पाणी घ्या तुम्ही सकाळी कॉफीची जागा लिंबू व लवंगयुक्त पाण्याने घेतल्यास तुम्हाला कॅफिन मिळणार नाही; पण त्या पाण्याचे स्वतःचे वेगळे फायदे आहेत. दूध व साखर असलेल्या एका सामान्य कॉफीमध्ये सुमारे १०० ते २०० कॅलरीज असतात; तर लिंबू व लवंगाच्या पाण्यात एक चमचा मध घातल्यास, त्या पेयात केवळ सुमारे २० कॅलरीज मिळू शकतात, असे विजयश्री म्हणाल्या आहेत.



कॅलरीजचे सेवन कमी करणे हे तुमचे ध्येय असल्यास हे पेय तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते . त्याशिवाय लिंबू व लवंगाचे खूप फायदे आहेत. विशेषतः जेव्हा तुम्हाला सर्दीची लक्षणे जाणवत असतील किंवा घसा खवखवत असेल तर आणि थंडीची लक्षणे जाणवत असताना दिवसातून दोनदा म्हणजेच सकाळी आणि संध्याकाळी लिंबू व लवंगाचे पाणी पिण्याची शिफारस केली आहे.

लिंबू व लवंगयुक्त पेय कसे बनवायचे ?

१. लवंग उकळवा : पाण्यात लवंग उकळून घ्या.

२. लिंबाचा रस आणि मध घालण्यापूर्वी तुम्ही उकळवलेले पाणी थंड होऊ द्या. क जीवनसत्त्व टिकवून ठेवण्यासाठी आणि कडूपणा टाळण्यासाठी पाणी गरम असताना लिंबू घालणे टाळा.

३. मध वापरा : आरामदायक प्रभाव आणि संतुलित चवीसाठी एक चमचा मध घाला.

तुम्ही हे पेय किती वेळा पिऊ शकता?

जर तुम्हाला सर्दी, खोकला किंवा घसा खवखवत असेल, तर साधारण सात ते १० दिवस दररोज हे पेय प्यावे, असे विजयश्री यांनी सुचवले आहे. हे पेय तुम्ही सकाळी किंवा संध्याकाळी पिऊ शकता. तसेच तुमच्या नेहमीच्या कॉफी किंवा चहाला हा एक खास पर्याय म्हणूनदेखील काम करील.

हे पेय कोणी पिऊ नये? हे पेय सगळ्यांसाठी सुरक्षित असले तरी, पेप्टिक अल्सर, अन्ननलिका समस्या किंवा घशाची संवेदनशीलता असलेल्या व्यक्तींनी हा उपाय काळजीपूर्वक वापरावा. मध घातल्याने लिंबाच्या आंबटपणाचा समान करण्यास मदत होते. त्यामुळे लक्षात ठेवा की, लिंबू व लवंगाचे पाणी थंडीच्या सौम्य लक्षणांपासून आराम देऊ शकत असले तरीही अधिक गंभीर संक्रमणांसाठी आरोग्य सेवा व्यावसायिकांचा सल्ला घेणे केव्हाही चांगले ठरेल.

## : खरंच शेवग्यामध्ये दह्यापेक्षा नऊ पट जास्त प्रथिने असतात? तज्ज्ञांनी केला खुलासा

इंटरनेटवर शेवग्याबद्दल तुम्ही वाचलेल्या अनेक गोष्टींपैकी एक म्हणजे त्यात दह्यापेक्षा नऊ पट जास्त प्रथिने आहेत. पण या दाव्याची पडताळणी करण्याचा प्रयत्न तुम्ही कधी केला आहे का? काळजी करू नका; जीवनसत्त्वे, खनिजे व अँटिऑक्सिडंट्स यांसारख्या आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध असलेल्या सुपरफूडप्रमाणे शेवग्याचे अनेक फायदे आहेत. त्याबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर जाणून घेऊ या शेवगा हा जीवनसत्त्वे ए, सी, ई, के व अनेक बी जीवनसत्त्वे, तसेच कॅल्शियम, लोह, पोटॅशियम व मॅग्नेशियम यांसारख्या खनिजांचाही चांगला स्रोत आहे. त्याशिवाय शेवग्यामध्ये फ्लेव्होनॉइड्स, पॉलिफेनॉल्स व बीटा–कॅरोटीनसह अँटिऑक्सिडंट्सचे उच्च प्रमाण असते; जे शरीरातील मुक्त रॅडिकल्स निष्प्रभ करण्यात, ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ कमी करण्यात मदत करतात. त्यामुळे हृदयविकार, कर्करोग व मधुमेह यांसारख्या जुनाट आजारांपासून संरक्षण मिळविण्यात मदत होऊ शकते, असे डॉ. संगीता तिवारी यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले. डॉ. तिवारी या आर्टे मिस लाइट येथे क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट म्हणून कार्यरत आहेत. इतकेच नाही, तर शेवगा हा फायबरने समृद्ध असल्याचे म्हटले जाते. त्यामुळे नियमित आतड्यांसंबंधीच्या कार्याला प्रोत्साहन मिळते, बद्धकोष्ठता



टाळता येते आणि निरोगी आतड्याच्या आरोग्याला (मायक्रोबायोमला ) समर्थन मिळते. त्याशिवाय शेवग्याच्या पानांमध्ये उच्च प्रमाणात असलेल्या क जीवनसत्त्व रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास आणि संक्रमणांपासून संरक्षण करण्यास उपयुक्त ठरते, असे डॉ. तिवारी यांनी सांगितले.

ब दुसरीकडे तज्ज्ञांनी असे सुचवले आहे, दही किंवा ग्रीक योगर्ट हा प्रथिनाचा चांगला स्रोत आहे, जो स्नायूंच्या आरोग्यासाठी आणि दीर्घकाळापर्यंत प्रतिकारशक्तीच्या विरूद्ध वारंवार आकुंचन टिकवून ठेवण्याची स्नायुच्या क्षमतेसाठी आवश्यक आहे. दह्यामध्ये प्रो–बायोटिक्स असतात, जे आतड्याच्या निरोगी मायक्रोबायोमला समर्थन देतात, तसेच पचन आणि पोषक शोषणास मदत करतात, असे मत डॉ. ऋतुजा उगलमुगले यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना व्यक्त केले. डॉ. ऋतुजा उगलमुगले या सेंट्रल येथे वोक्हार्ट रुग्णालयात अंतर्गत औषध तज्ज्ञ आहेत.

शेवग्यामध्ये दह्यापेक्षा नऊ पट जास्त प्रथिने आहेत का? याबाबत दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना मुंबई येथे अपोलो स्पेक्ट्रा येथे आहारतज्ज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या फौजिया अन्सारी यांनी सांगितले की, शेवग्यामध्ये दह्यापेक्षा नऊ पट जास्त प्रथिने असतात हा दावा वादातीत आहे. शेवगा खरोखरच पौष्टिकतेने समृद्ध आणि वनस्पती–आधारित प्रथिनांचा एक उत्तम स्रोत आहे; विशेषतः शाकाहारी आणि वनस्पती–आधारित आहार करणाऱ्या लोकांसाठी. दही विशेषतः ग्रीक दही हे प्रथिनांनी समृद्ध आहे. पण, एक गोष्ट दुसऱ्यापेक्षा नऊ पट चांगली आहे, असे सुचविणारा कोणताही अभ्यास नाही. संतुलित आहार हा नेहमीच महत्त्वाचा असतो. प्रथिनांचे सेवन प्रभावीपणे वाढविण्यासाठी आपल्या आहारात विविध पोषक समृद्ध पदार्थांचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. शेंगा, क्विनोआ, नट (दाणे), बिया, पनीर, मसूर, संपूर्ण धान्य व ओट्स हे प्रथिनांचे उत्कृष्ट स्रोत आहेत. प्रत्येक पदार्थ महत्त्वपूर्ण प्रथिनांच्या योगदानासह अद्वितीय आरोग्यदायी लाभ देतो. जर तुम्ही आहारात मोठे बदल करू इच्छित असाल, तर आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणे चांगले आहे. त्यामुळे तुम्हाला निरोगी आणि संतुलित पद्धतीने प्रथिनांचे सेवन कसे वाढवायचे याबद्दल मार्गदर्शन मिळू शकते, असे अन्सारी म्हणाल्या.

## शाहरुख खानने वयाच्या ५९ व्या वर्षी सोडले धूम्रपान; जाणून घ्या धूम्रपान सोडण्याचे फायदे

बॉलीवूडचा किंग खान, अशी ओळख असलेला अभिनेता शाहरुख खानचे असंख्य चाहते आहेत. त्याच्या चाहत्यांना शाहरुखविषयी नवनवीन गोष्टी जाणून घ्यायला आवडते. पण, फार कमी लोकांना माहीत असेल की, एकेकाळी शाहरुख खान हा खूप जास्त धूम्रपान करायचा; पण आता त्याने धूम्रपान करणे सोडले आहे. खरे तर हे त्याने आरोग्याच्या दृष्टीने उचललेले एक महत्त्वाचे अन् चांगले पाऊल आहे. त्याच्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांकडून आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात त्याने याविषयी सांगितले.

शाहरुख खान म्हणाला, एक चांगली गोष्ट आहे मित्रांनो, मी आता धूम्रपान करीत नाही. मला वाटले की, धूम्रपान सोडल्यानंतर मला दम लागणार नाही; पण तरीही मला श्वास घेण्यात अडचण येत आहे. पण देवाच्या कृपेने तेही ठीक होईल. त्याने घेतलेला हा निर्णय अनेक चाहत्यांसाठी एक सकारात्मक संदेश ठरलेला आहे.

मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलमधील पल्मोनरी मेडिसिन येथील सल्लागार डॉ. सुमित सिंघानिया सांगतात, धूम्रपान सोडल्याने आरोग्यास अनेक फायदे मिळतात; जे वाढत्या वयात जीवनशैलीची गुणवत्ता आणि दीर्घायुष्य वाढवू शकतात.

धूम्रपान सोडल्यानंतर कोणते आरोग्यदायी फायदे दिसून येतात? डॉ. सिंघानिया सांगतात, एखाद्या व्यक्तीने कितीही वेळा धूम्रपान केले असेल; पण धूम्रपान कायमचे सोडल्यानंतर लगेच आरोग्याचे दीर्घकालीन फायदे दिसून येतात. शाहरुख खानचा हा निर्णय त्याची ऊर्जा पातळी वाढवणारा ठरणार आहे. त्याच्या फुप्फुसाच्या क्षमतेमध्ये लक्षणीय सुधारणा होऊ शकते. संशोधनानुसार जे लोक धूम्रपान सोडतात, त्यांच्यासाठी नंतर स्ट्रोक, हृदयविकाराचा झटका यांसारख्या गंभीर आरोग्याच्या समस्यांचा धोका कमी होतो.

डॉ. सिंघानिया यांच्या मते, धूम्रपान सोडणाऱ्या वृद्धांची कालांतराने फुप्फुसाची क्षमता चांगली होते आणि हृदयाचे आरोग्यसुद्धा सुधारते. तसेच गंभीर धोकासुद्धा टाळता येतो.

दीर्घकालीन धूम्रपानाचे अनेक गंभीर परिणाम दिसून येतात; जसे की फुप्फुसावर काळे डाग दिसून येतात, हृदय व रक्तवाहिन्यांच्या कार्यामध्ये बदल दिसून येतो इत्यादी. डॉ. सिंघानिया यांच्या मते, यावर मात करता येते. धूम्रपान सोडल्यानंतर काही तासांत रक्तप्रवाहातील कार्बन मोनोऑक्साइडची पातळी कमी होते आणि त्यामुळे ऑक्सिजनची पातळी सामान्य होताना दिसून येते. त्यानंतर रक्तप्रवाह सुधारतो, श्वासनलिकेतील जळजळ कमी होते आणि श्वासाशी संबंधित आजार कमी होतात.

डॉ. सिंघानिया सांगतात, धूम्रपान सोडल्याने ऊर्जेची पातळी वाढते आणि ऑक्सिजनच्या पातळीमध्येही सुधारणा दिसून येते. तसेच शारीरिक हालचाल व सहनशक्ती वाढते.

धूम्रपान सोडल्याने कर्करोग होण्याचा धोका, विशेषतः फुप्फुस आणि घशाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. अभ्यास सांगतो की, धूम्रपान सोडणाऱ्या लोकांचे मानसिक आरोग्य सुधारते, रोगप्रतिकार शक्ती कमी होते; जे कोणत्याही संक्रमणाचा चांगल्या प्रकारे सामना करू शकतात. कोणत्याही वयात धूम्रपान सोडणे का महत्त्वाचे? डॉ. सिंघानिया सांगतात, जेव्हा लोक लहान वयात धूम्रपान सोडतात तेव्हा आरोग्याचे लाभ दिसून येतात. धूम्रपान सोडल्याने धूम्रपानसंबंधित आजारांचा धोका टाळता येतो. शारीरिक त्रास कमी करता येतो. मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते; तसेच रोगप्रतिकार शक्ती वाढते मग यांमुळे कोणतेही संक्रमण रोखण्यास मदत होते.

जेव्हा वृद्ध लोक धूम्रपान सोडतात तेव्हा त्यांच्या आयुर्मानात वाढ होते आणि त्यामुळे ते निरोगी आणि अधिक सक्रिय आयुष्य जगू शकतात. डॉ. सिंघानिया म्हणतात, धूम्रपान सोडायला कधीही उशीर होत नाही. अनेक वर्षांच्या सवयीनंतरही धूम्रपान सोडल्याने आरोग्य आणि जीवनशैलीची गुणवत्ता या दोन्ही गोष्टींवर चांगला परिणाम व बदल दिसून येतो.

# 'पातळी सोडाल तर याद राखा!' आ. संभाजी पाटील यांची अमित देशमुख यांना जाहीर तंबी

## हनुमान चौकातील विराट जनसभेने डॉ. अर्चनाताईंच्या विजयावर शिक्कामोर्तब

### गर्दीचा मोडला उच्चांक ...

मंगळवारी सायंकाळी हनुमान चौकात झालेल्या विराट सभेने गर्दीचे उच्चांक मोडीत काढले. हनुमान चौकात उभारलेल्या व्यासपीठापासून गोलाईतील देवीच्या मंदिरापर्यंत हजारोंचा जनसमुदाय सभा ऐकण्यासाठी दाटीवाटीत बसला होता. रस्त्याच्या कडेला फुटपाथवर उभे राहून अनेकांनी नेत्यांच्या भाषणांना दाद दिली.टाळ्यांच्या कडकडाटात डॉ. अर्चनाताई पाटील यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

### लाडक्या बहिणी जातीने हजर...

लातूर मतदार संघात डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या रूपाने प्रथमच एका महिलेला संधी देण्याचे काम भाजपा महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. यामुळेच हनुमान चौकात झालेल्या सभेला हजारो 'लाडक्या बहिणीं'नी उपस्थिती दर्शवल्याचे दिसून आले.





लातूर/प्रतिनिधी :- राजकारण करायचे असेल तर मर्दासारखे करा. समोरासमोर मैदानात उतरा. आमच्या भगिनीवर, सन्मान्य महिलांवर टीकाटिप्पणी करू नका. खालच्या भाषेत बोलू नका. त्या भाषेत आम्हालाही बोलता येते. पण आमच्यावर संस्कार असल्याने आम्ही तोल सुटू देत नाही. यापुढे बोलताना पातळी सोडाल तर याद राखा. जशास तसे उत्तर दिले जाईल, अशा शब्दात माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी आ. अमित देशमुख यांना थेट तंबी दिली.

गेल्या कांही दिवसात आ. अमित देशमुख व त्यांच्या समर्थकांकडून केलेल्या वक्तव्यांना अनुसरून आ. निलंगेकर यांनी उपरोक्त शब्दात आम्ही सर्व जण डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही दिली.

लातूर शहर मतदार संघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ हनुमान चौकात आयोजित विराट जनसभेस संबोधित करताना आ. निलंगेकर बोलत होते. मंचावर माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुब्बा, आ. अभिमन्यू पवार, माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, राष्ट्रवादीचे ड. व्यंकट बेद्रे, प्रशांत पाटील, शिवसेनेचे नेते ड.बळवंत जाधव, जिल्हाप्रमुख सचिन दाने, भाजपा माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, अल्पसंख्यांक मोर्चाचे मोहसीन शेख, सुधीर धुत्तेकर, पीपल्स रिपब्लिकन पार्टी जोगेंद्र कवाडे गटाचे डी. ई. सोनकांबळे आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

सभेला मार्गदर्शन करताना आ.संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, काँग्रेसकडून एका महिलेचा अवमान होत आहे. सोशल मीडियातून अवमानकारक मजकूर आणि व्हिडिओ वारंवार पसरवले जात आहेत. पण यापुढे असे चालणार नाही. चुकून जरी असे बोलाल तर क्षमा केली जाणार नाही. आम्ही क्रिकेट खेळणारे भाऊ नाही तर कुस्ती खेळणारे खमके भाऊ आहोत. त्यामुळे यापुढे विचार करा. एक महिला काय करू शकते? हे तुम्हाला माहीत नाही. आम्ही खंबीरपणे डॉ. अर्चनाताई पाटील यांच्या पाठीशी उभे आहोत, असेही आ. निलंगेकर म्हणाले.

१५ वर्षात काय केले? असा प्रश्न विचारल्याने देशमुख यांना राग आला असेल. पण आपण काम केले असते तर हा प्रश्नच उपस्थित झाला नसता. अमित देशमुख हे हवाई आमदार असल्याची टीका करत आता लातूरकरांना निवासी आमदार हवा असल्याचे आ. निलंगेकर म्हणाले. लातूरकरांना ८ दिवसाला पाणी मिळते. कारखान्याला मात्र रोज पाणी पुरवठा होतो. अमित देशमुख विकासाच्या रकमेची आकडेवारी सांगतात पण ती खोटी आहे. या योजना तर भाजपाने मंजूर केल्या आहेत. सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल भाजपाने मंजूर केले. देवेंद्र फडणवीस यांनी वॉटर ग्रीडच्या माध्यमातून पाण्याची व्यवस्था केली. मनपात भाजपाची सत्ता असताना रोज घंटागाडी येत होती पण टेंडरची टक्केवारी न मिळाल्याने देशमुख यांनी ती व्यवस्था बंद पाडल्याची टीकाही आ. निलंगेकर यांनी केली.

बाभळगाव अँड कंपनी लातूरकरांचे शोषण करत आहे. आता लातूरकरांना आपल्या भविष्याची काळजी करावी लागणार आहे. शिक्षणाची पंढरी असणाऱ्या लातुरात गांजा आणि ड्रग्सचा व्यापार होत असून हे पुरवठादार कोणाचे हस्तक आहेत? असा सवालही आ. निलंगेकर यांनी उपस्थित केला.

पाणी प्रश्नाचे काय झाले? असे विचारणाऱ्या व्यापाऱ्याला मारहाण झाली. या मारहाणीचा बदला २० तारखेला मतदान करून व्यापारी घेतील. शहरात आज संपवून टाकण्याची, गुंडगिरीची व दादागिरीची भाषा होत आहे. शहर सुरक्षित ठेवायचे असेल तर काँग्रेसला हद्दपार करा असे सांगून लडका बिगड गया है,उसे अब घर बिठाओ असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले.

आता शेवटच्या टप्प्यात लक्ष्मी दर्शन होईल. लक्ष्मीला नाही म्हणू नका पण खऱ्या लक्ष्मीला मतदान करा. विलासरावांच्या नावाचा चेक आपण तीनदा कॅश केला. पण आता तो बाउन्स होणार आहे. विकासाची गंगा लातुरात आणण्यासाठी अफवांवर विश्वास ठेवू नका. रडून भावनिक आवाहन केले तर त्याला भुलू नका. देशमुखांना हवेतून जमिनीवर आणण्यासाठी महायुतीला विजयी करा, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले.

माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा यांनी १९८० पासून घरात सत्ता असतानाही जनतेला पाणी न मिळणे ही शोकांतिका असल्याचे सांगितले. लातूरकरांनी देशमुख यांना एवढे वर्ष का सहन केले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. मतदारांना हिशोब मागण्याचा हक्क आहे. आपल्या बहिणी पाण्यासाठी वणवण भटकवण्यातच अमित देशमुख यांना आनंद वाटतोय. आता परिवर्तन केले नाही तर देशमुख लातूरच्या जनतेला च्युईंगम बनवतील,असेही खुब्बा म्हणाले.

आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, डॉ. अर्चनाताई पाटील यांना मत म्हणजे शिवराज पाटील यांना मत आहे. देशमुख यांनी घोषणा केलेले उजनीचे पाणी आलेच नाही. आता अर्चनाताई पाटील पाणी आणतील. लातुरचा कचरा ही 'देवघर'ची गृहलक्ष्मीच स्वच्छ करेल. लातूरचे राजपुत्र आतापर्यंत कधी रस्त्यावर उतरले नाहीत. आता त्यांना जनता आठवत आहे. काँग्रेसमध्ये लुटारूंचा कारभार सुरू आहे. देशमुख सांगतात त्यातील ६०० कोटी रुपये तर आम्हीच दिले आहेत. मल निःसारण प्रकल्पासाठी जागा, अमृत योजना, शादीखाना, नाट्यगृह, सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल, लिंगायत स्मशानभूमी, स्वच्छता गृहे, शौचालये आम्ही दिली. तुम्ही काय केले? असा सवालही आ. पवार यांनी उपस्थित केला.

बसवराज पाटील मुरूमकर यांनी डॉ. अर्चनाताई पाटील लातूरकरांची स्वप्न पूर्ण करतील, असा विश्वास व्यक्त केला. जनतेने विवेकबुद्धीला स्मरून मतदान करावे. लातुरचे वैभव वाढवण्यात चाकूरकर परिवाराचे योगदान आहे. आताही ताई कमी पडणार नाहीत. ताईंना मत दिले तर लातुरकरांना स्वाभिमानाने जगण्याची संधी मिळेल, असेही बसवराज पाटील म्हणाले.

उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, १५ वर्षांचा हिशोब मी मागत नाही तर लातूरची जनता मागत आहे. आजवर तुमचे मत गृहीत धरले जात होते. त्यामुळे प्रश्न विचारण्याची संधी मिळत नव्हती. सवाल तो हम पूछेंगे असे म्हणत लातुरकरांना पाणी मिळाले का? व्यापाऱ्यांच्या अडचणी सुटल्या का? वैद्यकीय व औद्योगिक विश्वात कोणाची दहशत आहे? ट्युशन एरियात काय चाललेय? अशी प्रश्नांची सरबत्ती डॉ. अर्चनाताई पाटील यांनी केली. लातूरकरांना झुलवत ठेवण्याची परंपरा मोडायची आहे.जनतेला विश्वास व सन्मान हवा आहे. जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न सोडवायचा आहे. माझे भाऊ माझ्या पाठीशी आहेत. दुसऱ्यांच्या मतदार संघात जाऊन 'करेक्ट कार्यक्रम करतो' म्हणणाऱ्यांचा 'कार्यक्रम' करण्यासाठी आ. संभाजीभैय्या इथे आले आहेत, असेही डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

डॉ. सुनिल गायकवाड, देविदास काळे, ड. व्यंकटराव बेद्रे, ड. बळवंत जाधव, सचिन दाने यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. विकास कारखान्याचे १५ वर्षांपासूनचे कर्मचारी युसुफ शेख तसेच काँग्रेसच्या शेकडो बुथ कार्यकर्त्यांनी यावेळी भाजपात जाहीर प्रवेश केला.

या विराट जनसभेस रुद्रालीताई पाटील चाकूरकर, ड. दिग्विजय काथवटे, अजित पाटील कव्हेकर, मंगेश बिराजदार, गणेश गवारे, मीनाताई गायकवाड, सौ. शोभा पाटील, प्रविण सावंत यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी आणि हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

## वंचितचे उमेदवार विनोद खटके यांची हरंगुळ खुर्दच्या लमाण तांड्यावर वडार वस्तीत पदयात्रा काढून घेतल्या मतदारांच्या भेटी





लातूर : लातूर शहर विधानसभेचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांनी लातूर शहरालगत असलेल्या हरंगुळ खुर्द येथील वडारवस्ती व लमाण तांड्यावर वाजत गाजत पदयात्रा कढून मतदारांना वंचितच्या गॅस सिलिंडरवर मतदान करण्याचे आवाहन केले. महिलांनी विनोद खटके यांचे औक्षण केले. वडार वस्ती व लमाण तांड्यावरील समस्या सोडवण्याची मागणी केली. तेव्हा तुमच्या समस्या सोडवण्यासाठीच मी निवणुकीत उभा आहे. राशन मिळत नसल्याच्या तक्रारी यावेळी लोकांनी विनोद खटके यांच्याकडे केल्या. उद्या मला फोन करा.. उद्याचं रेशन मिळून जाईल, अशी त्यांनी ग्वाही दिली. यावेळी हजारो बंजारा बांधव व वडार समाज बांधव उपस्थित होते

## विकास कामात आघाडीने आणले अडथळे



परभणी / प्रतिनिधी

युती सरकारने २०१९ ला मराठवाड्यात ४०० हजार कोटींची मराठवाडा ग्रीड योजना आणली मात्र महाविकास आघाडी सरकारने केवळ द्वेषापायी ही योजना गुंडाळून ठेवून दुष्काळी मराठवाड्याला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे पाप केले. राज्यातील अनेक योजना त्यांनी बंद पाडल्या. विकास कामात ख-या अर्थाने महाविकास आघाडीनेच अडथळे आणल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा यांनी केला.

जिंतुर विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार मेघना बोर्डीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना शहा म्हणाले की, गेली अनेक वर्ष सत्ता भोगलेल्या व आता सत्तेकरीता अक्षरशः हापापलेल्या महाविकास आघाडीने लोकसभे पाठोपाठ हरियाणा व आता महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर निगेटिव्हीटी, अपप्रचार सुरु केला असुन सर्वसामान्य मतदारांची दिशाभूल केली जात आहे. काँग्रेस आघाडीचे हे प्रयत्न हरियाणात अक्षरशः फोल ठरले. महाराष्ट्रातील जागरुक मतदार काँग्रेस आघाडीचा सुपडा साफ करतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, माजी आमदार हरिभाऊ लहाने, उमेदवार तथा आ. सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, राष्ट्रवादीचे प्रताप देशमुख, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे, गंगाधरराव बोर्डीकर, राधाजी शेळके आदी उपस्थित होते.

### रामापूर येथील शेतातून २७ गांजाची झाडे जप्त

पालम : पालम तालुक्यातील मौजे रामापुर येथील रहिवासी असलेल्या संजय बाबूराव सुरनर यांच्या मालकीच्या असलेल्या बनवस शिवारातील गट नंबर ५८१मध्ये असलेल्या कपाशीमध्ये गांजाची झाडे आढळली आहेत. पोलिसांनी २७ गांजाची झाडे हस्त केली आहेत. या प्रकरणी आरोपी सुरनर यांना ताब्यात घेतले असून गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांना गांजाच्या झाडा विषयी गोपनीय माहिती मिळाल्याने पोलिस निरीक्षक सुरेश थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सवंडकर, पोलीस हवालदार एस.पी. कोलमवाड बाबू शिंगनवाड, बळवंते यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन शहानिशा केली असता संबंधित शेतामध्ये गांजाची झाडे आली.

## २६ वर्षापासून किनवट तालुक्याकडे दुर्लक्ष आधी दोन राज्यमंत्री; नंतरचा काळ नामदाराविनाच!

### :विकासाला पोहोचली बाधा

जिल्हा मुख्यालयापासून दीडशे किलोमीटर लांब असलेला किनवट मतदारसंघ असून त्यातही लोकसभेला हा मतदा-रसंघ हिंगोली लोकसभेला जोडून जिल्ह्याशी केवळ जिल्हा मुख्यालयाच्या कामापुरती ठेवला आहे.

खासदार हिंगोली मतदारसंघाचा असल्याने नांदेड जिल्ह्याच्या कोणत्याही नेत्यांचे इकडे लक्ष राहिलेले नाही. त्यामुळे अनेक अंगांनी किनवटच्या विकासाला बाधा पोहोचली आहे.

### जिल्ह्याची मागणी प्रलंबितच

मांडवी व इस्लापूर तालुके घोषित करून किनवटला जिल्हा १ करण्यात यावा, ही मागणी गत तीन दशकांपासूनची आहे; पण जिल्ह्याच्या मागणीचा शासनाला अजूनही विसरच पडलेला आहे. महाविकास आघाडी शासन असो किंवा महायुती शासन असो कोणत्याही सरकारने इकडे लक्ष दिले नाही. त्यातच जिल्ह्याच्या निर्मितीसाठी स्थापन करण्यात आलेली वेगवेगळ्या पक्षाचा समावेश असलेली जिल्हानिर्मिती कृती समितीची अॅक्टिव्हीटी थंडावल्याने किनवट जिल्ह्याची मागणी प्रलंबितच राहिली आहे, हे तितकेच खरे.



किनवट/शेख शौकत :-किनवट विधानसभा मतदारसंघात १९७७ ला दिवंगत उत्तमराव राठोड यांना वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात महसूल राज्यमंत्रिपद मिळाले. या कालावधीत ते नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री होते. तर १९९८ युती शासनाच्या काळात डी. बी. पाटील हे महसूल राज्यमंत्री होते. ते यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री होते. किनवट मतदारसंघाला दोनवेळा महसूल राज्यमंत्रिपद मिळाले. त्यानंतर मात्र २६ वर्षांपासून किनवट तालुक्याला मंत्रिपद काही मिळाले नाही. विजयाची हॅटट्रिक करणारे माजी आमदार प्रदीप नाईक हे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत विजयाचा चौकार मारतील आणि महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळात समावेश असेल अशी अपेक्षा होती; पण पराभवाला सामोरे गेल्याने मंत्रिपद मिळण्याची संधी हुकली आणि भीमराव केराम आमदार झाले. किनवट तालुक्याचे जावई मंत्री संजय राठोड हे महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो दोन्ही मंत्रिमंडळांत होते; पण त्यांनीही पाहिजे तसे लक्ष दिले नाही. किनवट तालुक्याला मुख्यमंत्र्यांच्या रूपाने दिवंगत सुधाकरराव नाईक हे जावई म्हणून मिळाले होते. तर आता नामदार संजय राठोड मंत्र्याच्या रूपाने जावई मिळालेले आहेतच; परंतु तत्कालीन मुख्यमंत्री राहिलेल्या जावयाने किनवटकडे लक्ष दिले ना आता मंत्रिमंडळात असलेल्या जावयाने लक्ष दिले? त्यामुळे उपेक्षा कायम राहिली आहे. खरे तर निदान जिल्ह्याची मागणी मार्गी लावण्यासाठी दिवंगत मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी पुढाकार घेतला असता तर ते शक्य झाले असते; पण त्यांनी त्या काळी ते पुसद जिल्ह्यासाठी आग्रही होते. त्यामुळे ना किनवट जिल्हा झाला, ना पुसद जिल्हा झाला? त्यामुळे यापुढील काळात तरी अपेक्षा पूर्ण होतील का, अशी चर्चा होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE